

# त्याचे मित्र यांची गोष्ट



मुंबईमध्ये सेमाला अगदी रडूं येत असे. कोहिमाच्या हिरव्यागार भातखाचरांतून तो नुकताच मुंबईला आला होता. कोहिमामधल्या घरीं तो जागा होई, तो, पक्ष्यांची किलबिल ऐकून ! मोटारीचा पोंगा ऐकून नव्हे. मुंबईत त्याला इतक्या उंच इमारती दिसत की त्यांच्यांकडे पाहतांना त्याची मान दुखूं लागे. अर्थात्, मुंबईतहि त्याला आवडणाऱ्या कांही गोष्टी होत्याच ! म्हणजे, सगळीकडे दिसणारा मिठाईवाला, तसेंच सिनेमा वगैरे !

सेमाच्या काकांनी त्याला शाळेत घालण्यासाठीं मुंबईला आणलें होतें. "तूं चांगलं शिकलं पाहिजेस" असें त्यांनी सेमाला कोहिमांतच सांगितलें होतें. कोहिमाध्ये सेमाला खेळाशिवाय कांहीं सुचायचेंच नाहीं

सेमा शाळेवर खुष होता, पण तिथेहि त्याला सगळयांत जास्त कांही आवडत असेल तर तें म्हणजे खेळांचा तास ! धावण्यांत तो शाळेंत पहिला होता. नारळाच्यां झाडावरहि तो सरसर चढत असें.

सेमा शाळेंत जायला लागल्यानंतर कांही दिवसांनी त्याच्या काकांनी त्याला हाक मारली. "काय, शाळा आवडते ना ?" त्यांनी विचारलें." "कोणाकोणाशी दोस्ती झाली ?" त्यांनी पुनः विचारलें.

"मला सगळेच आवडतात." सेमा म्हणाला. "पण माझे जिगरदोस्त आहेत भट्टाचार्य, सावित्री आणि अली ! धडे कठीण आहेत पण सावित्री नेहमीच मला मदत करते."

"परीक्षेंत पास झालास तर मी तुला एक चांगली जंमत देईन बोल तुला काय हवं ?" काकांनी विचारलें.

काय मागावें बरें ? सेमा विचारांत पडला. नंतर एकदम म्हणाला, "मला घडयाळ हवं हिरव्या पट्टयाचं ! मला तें फार आवडतं."

"परीक्षेंत चांगलां पास झालास तर तुला घडयाळ देईन !" काका म्हणाले.

सेमाला व त्याच्या सोबत्यांना "चोर ! चोर !" खेळायला फार आवडे. रविवारीं ते सगळे भट्टाचार्यच्या घरीं खेळायला जमले भट्टाचार्यच्या घरासमोर खूप मोठें मैदान होतें. त्याच्या सगळया बाजूंनी झाडें होतीं.

सेमा व त्याचे मित्र अगदी दमेपर्यंत खेळलें.

"भट्टाचार्य आता आपण तुझ्या घरीं पाणी पिऊं." सेमा म्हणाला.

"होय रे, पाणी मिळालं नाही तर मी मरेन" सावित्री म्हणाली. परंतु भट्टाचार्य कांहीच बोलेना. तुम्हालां माझ्या घरीं येतां येणार नाहीं तो हळू आवाजांत म्हणाला.

"कां नाही ?" सगळे जण एका सुरांत ओरडले.

"कारण मी जर तुम्हांला पाणी दिलं तर माझी आजी मला मारेल, ती खूप म्हातारी आहे आणि आरडाओरडहि पुष्कळ करते."

सेमाचा स्वतःच्या कानांवर विश्वासच बसेना ! "तूं आम्हांला पाणी दिलंस तर तुझी आजी तुला कां मारेल ?" त्याने विचारलें.

"तूं दुसऱ्या जातीचा आहेस आणि सावित्री पण ! मी तुम्हांला घरीं बोलावूं शकत नाहीं. खरं म्हणजे मी तुमच्याबरोबर खेळत असतो इतकं जरी आजीला समजलं तरी ती खूप रागावेल."

भट्टाचार्यचा चेहरा लाल झाला होता. त्याला फारच वाईट वाटत असावें.

सावित्रीला फार राग आला. "तिनं आम्हांला पाणी कां देऊं नये ? आमचं कांही तरी चुकलं आहे का ?"

"मला असं सांग भट्टाचार्य सेमा म्हणाला." मी आणि सावित्री 'पाणी पाणी' करून मरायला लागलो तरी तुझी आजी आम्हांला पाणी देणार नाही."

भट्टाचार्य गप्पच होता. नंतर तो म्हणाला, तें मी विचारले नाहीं, पण तें माझं घर असतं तर मी तुम्हांला नक्कीच वाटेलतें दिलं असतं."

"आता सगळे माझ्या घरीं चला." चंद्रकांत म्हणाला, फारच शांत मुलगा होता तो. "मी तुम्हाला पाणी देतो." मग सगळेचजण त्याच्या मागोमाग घरांत गेले. रडायला आलेला भट्टाचार्य पण.

त्या दिवसापासून एकएक वेगळीच गोष्ट घडूं लागली. सेमाला नवल वाटूं लागलें कांही लोक (बिचारे) दुस-या लोकांच्या घरीं जाऊं शकत नाहींत हेंहि त्याला समजलें. बसमध्ये बसल्याबसल्या सेमा स्वत:शींच विचार करायचा, हा माझ्या शेजारचा ब्राह्मण आहे, तर पुढल्या सीटवरला हरिजन की काय ? असलाच विचार करण्यांत त्याचा वेळ चांगला जाई.

एक दिवस असाच कसला तरी तास चालला होता. आपल्या देशांत कोणकोणत्या योजना आहेत व त्यांच्यापासून लोकांचे कसे फायदे होतात, हें गुरूजी सांगत होते. भाकडा धरणाची माहिती सांगताना ते म्हणाले, की, त्यामुळें ४५ लाख एकर जमिनीला पाणी मिळालें आहे व हजारों शेतकरी श्रीमंत झाले आहेत. सेमाला हें खरेंच वाटेना ! सगळे एवढे एकाच धरणामुळे ?

इंजिनियर, शास्त्रत, तंत्रज्ञ आणि इतरहि जाणकार अशा या सर्वोत्कृष्ट मंडळींनी देशाच्या उभारणीला कशी मदत केली तेंहि त्यांनी यांगितले.

सेमा उभा राहिला. "हीं इतकीं चांगली माणसं कुठून येतात ?" त्याने विचारलें.



“म्हणजे काय ?” गुरूजींनी कांहीशा रागानेच विचारलें. वर्गांत चालेला विषय एकदम बदलायची सेमाला संवय होती. व ती गुरूजींना माहीत होती.

“हे सगळे चांगले लोक कोणत्या जातीचे आहेत ?” त्याने विचारलें.

“काय प्रश्न हा !” गुरूजी म्हणाले,” हे लोक सगळयाच जातींतून, प्रांतातून, धर्मातून आले आहेत. एकाच जातींत सगळयांत चांगले लोक असतात, असं नाहीं.



तितक्यांत पांडे उठून उभा राहिला. “गुरूजी हा अली पण आमच्यासारखाच आहे कां ? तो तर मुसलमान आहे.”

“तुम्ही सगळयांनी आज हें चालवलं आहे तरी काय ?” गुरूजींनी विचारलें. “अली तुझ्यासारखाच आहे. पण तो या प्रभूसारखा मात्र नाही. तो कांही त्याच्यासारखा वर्गांत भूताखेताच्या गोष्टी वाचत नाहीं. हां, पण तो चंद्रकांतसारखा मात्र नक्कीच आहे. कारण त्यालाहि शाळा सुटल्यावर अभ्यास करावसा वाटत नाही. गोटया खेळायला आवडतं”

थोडयाच दिवसांनी परीक्षा सुरू झाली. आता सेमा व त्याचे मित्र यांना खेळाचा वेळहि अभ्यासाकरीता द्यावा लागे. अभ्यासांत मदत पाहिजे म्हणून सेमाने सावित्रीचा पिच्छाच पुरवला. “सावित्री, तुझ्या मदतीमुळे मी पास झालो नी मला घडयाळ मिळालं तर तें मी तुला देईन”. तो खुष होऊन म्हणाला.

कधीकधी सावित्री सेमाकडे सकाळींच अभ्यासाला येत असे: मग त्यांचा निवांतपणे अभ्यांस चाले.

सेमाचे पेपर चांगले गेले. त्याचा परीक्षेंत तिसरा नंबर आला. त्याला फार आनंद झाला. सावित्रीचा वर्गात पहिला नंबर आला होता पण सेमाचा निकाल ऐकून तिलाहि खूप आनंद झाला. “आता तू मला तुझं घडयाळ दिलं पाहिजे.” तिने सेमाला आठवण करून दिली.

सेमाच्या काकांनी त्याला हिरव्या पट्टयाचे घडयाळ दिलें. शाळा सुटल्यावर सेमाने तें सावित्रीला दिलें. “तुझ्या हातापेक्षां माझ्याच हातावर हें घडयाळ जास्त चांगलं बसतं.” ती हंसून म्हणाली.

सेमाच्या काकांनी त्याला थोडेसे पैसे पण दिले होते. त्याच्या लिमलेटच्या गोळया घ्यायच्या असें त्याने ठरवलें. रस्ता ओलांडतांनाच त्याच्या तोंडाला पाणी सुटू लागलें होतें.

पण एकहि मिठाईवाला तिथे नव्हता. सर्व दुकानें बंद होतीं. सेमा इकडे तिकडे पाहूं लागला. आज कांही तरी वेगळेंच वाटत होतें. नेहमीचा बुटपॉलिशवालाहि तिथे नव्हता.

आजूबाजूला सगळीकडे होते फक्त पोलिसाशिपाई. त्यांच्या हातांत होत्या लाठ्या-काठ्या. सगळीकडे खाकी कपडेवालेच. सेमाला आता भीति वाटू लागली. तो बसस्टॉपवर उभा राहिला. काय करावे हेंच त्याला समजेना.

कांही मिनिटांनी एक प्रेमळ दिसणारा म्हातारा तिथे आला व जवळच्या भिंतीला टेकला. "आज हें काय चाललें आहे. सेमाने त्याला विचारलें. म्हातारा फारच दुःखी दिसत होता. त्यांने सुस्कारा सोडला. "मला स्वतःलाच समजत नाही" तो हळू आवाजांत म्हणाला. "आजकाल प्रत्येकाला दुस--याशी झगडायची हौस आहे."

त्याचवेळीं रस्त्यावरून पोलीस-लॉ-या एका मागोमाग एक अशा गेल्या. त्यांत लोक खचून भरले होते. ते काय ओरडत होते ते सेमाला कळलें नाहीं पण ते क्रूर वाटत होते. त्यांच्याकडे पाहिल्यावर सेमालां भीति वाटली.



"हे काय ओरडत आहेत ?" सेमाने त्या म्हाता-याला विचारलें. म्हातारा म्हणाला," हे लोक म्हणतात की इतर प्रांतातल्या लोकांनी त्याच्या प्रांतांत परत जावं, कारण त्यांना इथली भाषा येत नाहीं.

"पण ते भारतीय नाहीत कां ? सेमाने विचारले. त्याला हें सगळे कोडेच वाटत होतें.

"अर्थातच आहेत" म्हातारा उत्तरला. "पण इतर भागांतल्या लोकांनी इथे राहूं नये एवढी एकच गोष्ट ते यावेळी लंक्ष्यांत ठेवतात. ह्या लोकांना इतर प्रांतांतल्या लोकांना बाहेर घालवायचे आहे. त्यानी इथे काम केले तर तें या लोकांना आवडणार नाहीं. ते खरेखुरे भारतीय नाहीतच.

"तुझ्यासारख्या कोवळया मुलानं या क्रूर गोष्टी पाहणं बरोबर नाहीं. संकटांत सापडशील." म्हातारा म्हणालां. त्याने सेमाचा हात धरला व त्याला त्याच्या घरी पोचवण्याची जबाबदारी घेतली.

रस्ताभर सेमा त्या म्हाता-याला सारखे प्रश्न विचारत होता. त्याला ब-याच गोष्टी समजत नव्हत्या. एवढें मात्र त्याला कळून चुकलें की, हे लोक निराळी भाषा बोलणा-यांना बाहेर घालवू इच्छितात.



"पण बाकीच्या प्रांतातल्या लोकांनी इथे काम करूं नये असं ह्या लोकांना कां वाटतें ?" सेमाने म्हाता-याला विचारलें. "त्यानी कांहीं चोरी केली आहे कां ?"

"नाही" तो म्हातारा उत्तरला.

"पण हे लोक इथली भाषा शिकले तर त्यांना इथे आनंदानं राहतां येईल कां ? सेमाने विचारलें. "मला तसं वाटतं नाहीं" म्हातारा म्हणाला.

त्यानंतर आठवडाभर शाळा बंदच होती. सेमाला शाळेची ओढ होती काम नसल्यामुळे घरीहि त्याला एकटें वाटे. त्यांतच भर म्हणून की काय, काकांनी त्याला घराबाहेरहि जाऊं दिले नाहीं. बाहेर गडबड चालूं असल्याचें त्यांनी सांगितलें.

"पण आज ही गडबड कशाबद्दल ? सेमाने विचारलें.

आठवडाभराने शाळा उघडली. सेमाला फार आनंद झाला. भट्टाचार्य, सावित्री, चंद्रकांत, सर्वांचीच त्याला भेट घ्यायची होती.



पण सावित्री शाळेंत आलीच नाहीं. शाळा सुरू होऊन आठवडा झाला तरीहि ती आली नाही. एक दिवस सेमा उठून उभा राहिला आणि त्याने गुरूजींकडे सावित्रीची चौकशी केली.

"ती आजारी तर नाही ?" त्याने गुरूजींना विचारलें.

गुरूजीहि फारच उदास दिसत होते. त्यांनी आपल्या हातांतील पुस्तक खिन्नपणे बाजूला ठेवलें." खरं म्हणजे मी हें सांगणारच नव्हतो, सेमा ते म्हाणाले, "कारण तुम्ही सगळे बेचैन होणार हें मला माहित होतें. असो तुम्हाला ते केव्हातरीं कळणारच आहे. सावित्री आता शाळेत येणार नाहीं".

"काय ? . . . पण कां ? सेमाने विचारलें, तिच्यापाशी माझं घडयाळ आहे."

"सावित्री मद्रासला परत गेली" गुरूजी थकलेल्या आवाजांत म्हणाले." अलीकडेच जी गडबड झाली तींत तिचं घर आणि सामान-सुमान जळलं गेलें, पण तिचं नशीब चांगलं म्हणूनच ती आईवडलांबरोबर सुखरूप निसटली, तिच्या वडिलांनी इथे वीस वर्षे नोकरी केली. पण आता ते मद्रासकडेच नोकरी करणार आहेत."

"पण त्यांनी असं केलं तरी काय ?" चंद्रकांतने विचारलें.

"कांहीसुध्दा नाहीं," गुरूजी खिन्नपणें म्हणाले.

थोडयावेळाने ते म्हणाले, "या राज्यांतल्या कांही लोकांना इतर राज्यांतले लोक इथे आलेले आवडत नाहींत. आपण सर्व भारतीय तसेंच माणसं आहोंत, हेंहि ते विसरतात."

नंतर ते हळू आवाजांत म्हणाले, "सावित्री माझी सगळयांत उत्तम विद्यार्थिनी होती. तिची उणीव मला फार जाणवते."

हें सर्व झाले तरी विस्कटलेली घडी मात्र सावरली नाहीं. कधीकधी शाळा सुटल्यावर सेमा शाळेच्या पाय-यांवर बसून राही व विचार करी. सावित्रीला काय वाटत असेल ? तिच्या आईवडिलांना किती त्रास झाला असेल.

अलीहि खिन्न दिसे. अलीकडे तो पहिल्यासारखा मिळूनमिसळून वागत नसे. एक दिवस सेमा त्याला म्हणाला, "अली आजकाल तूं कोणाशीहि बोलत नाहीस, असं कां ?"

"कोणालाहि माझ्याशी बोलावसं वाटत नाही की कोणी माझ्याशी खेळतहि नाही," अली म्हणाला, "सावित्रीशी माझी सर्वांत जास्त मैत्री होती. पण ती तर निघून गेली. आता फक्त तूं आणि भट्टाचार्यच माझ्याशी बोलता. बाकीची मुलं मला म्हणतात, "तूं पाकिस्तानला कां जात नाहींस ?"

दुस-या दिवशीं इतिहासाचा तास चालू असतां सेमा उठून उभा राहिला.

"गुरूजी, अलीनं पाकीस्तानांत परत जावं का ?" तो म्हणाला. "सगळी मुलं त्याला तसंच सांगतात."



गुरूजी खूपच रागावले.

मुरलीकडे वळून ते म्हणाले, "तूं दक्षिण भारतांतून आला आहेंस. तिथेच कां राहत नाहींस ?"

मुलें गप्प बसलीं.

"आपला जिथे जन्म झाला तिथेच राहायचं सर्वांनी ठरवलें तर आपल्यापैकी अर्ध्याअधिक जणांना इथून जावं लागेल." गुरूजी म्हणाले. "परिणाम असा होईल की, कांही भागांत पुष्कळ शास्त्रज्ञ असतील, त्यांना तिथे काम मिळणार नाहीं आणि ज्यांना खरोखर शास्त्रज्ञ हवे असतील, अशा भागांना मुळीच मिळणार नाहींत."

भटकडे वळून त्यांनी विचारलें, एखादा माणूस बुडत असेल तर त्याला वांचवण्यापूर्वी तूं त्याचा धर्म, जात आणि विभाग विचारीत बसशील कां ?

"नाहीं गुरूजी" भटने उत्तर दिलें.

"तुम्हांला असा चांगला विचार करतां येतो याचा मला आनंद वाटतो, कारण आपण जर तसला विचार करीत असलों तर स्वतःला माणूस म्हणवून घेऊं शकणार नाहीं." गुरूजी म्हणाले.

सुट्टया सुरू झाल्या. कोहिमाकडे निघालेल्या बसमध्ये सेमा बसला होता. केव्हा घरीं पोचतो असें त्याला झालें होतें. व त्यामुळें तो जागच्याजागीं चुळबुळ करीत होता. सर्व जुन्या दोस्तांना भेटावें व मुंबई-सारख्या अजब शहराबद्दल सांगावे, असें त्याला सारखें वाटत होतें कोण कोणत्या जातीचा आहे याची पर्वा न न करतां प्रत्येक दोस्ताबरोबर खावें-प्यावें खेळावें अशी त्याची ओढ होती.

शहरांतले लोक कसे असतात हें जर आईला सांगितलें तर ती कधीच मला मुंबईला परत पाठवणार नाहीं सेमाचे विचार चालू होते.

बसस्टॉपवर सेमाचे आईवडिल व मित्र आले होते.





"सहा महिन्यांत कितीं उंच झालास रे ?" वडील कौतुकाने म्हणाले. "आता तुला पुन्हा नवे कपडे शिवावे लागणार" आई हंसून म्हणाली.

"आणि हो ! तुझ्या काकांनी तुला घडयाळ दिलं असं तूं लिहिलं होतंस. हातावर तर दिसत नाही. हरवलं तर नाहींस ना ?" वडिलांनी विचारलं.

"नाहीं. पण त्याबद्दल मी नंतर सांगीन" सेमा म्हणाला. घडयाळाचा विषय निघाला की त्याला सावित्रीची आठवण होई व तो खिन्न होत असे.

एक महिना कसा गेला तें सेमाला कळलेंच नाही. शाळेसाठीं तो पुन्हा मुंबईला निघाला.

उदास, विषण्ण. कोहिमात सगळया गोष्टी कशा छान होत्या. कोहिमाहून जावेसे त्याला वाटत नव्हतें. परंतु त्याच्या आईला तें कबूल नव्हतें.

"लवकर लवकर शिकायचं आणि खूप मोठं व्हायचं" तिने सेमाला सांगितलें.

सेमा मुंबईला आला. स्टेशनवर त्याचे काका आले होते त्याला घ्यायला.

"कशी गेली सुट्टी ?" त्यांनी विचारलें.

"वा. माझा वेळ तर फारच छान गेला." सेमा म्हणाला, "पण मुंबईला आल्याचाहि मला आनंद वाटतो."

एका जुन्या घोडागाडीतून ते घराकडे निघाले, रस्ते वेगळेच वाटत होते. घराजवळ सेमाला एका ठिकाणीं भिंतीवर कसलेतरी काळपट मोठाले ठिपके दिसलें कांही ठिकाणीं घराच्या नुसत्या तुळयाच लोंबकळत होत्या.

"काका, काय झालं हो ?" सेमाने विचारलें. आता ते घराजवळच्या एका कापड गिरणीच्या जागेजवळून चालले होते. ही गिरणी सेमाने खूप वेळ पाहिली होती.



पण आता काय उरले होते तिथे ?

"अहमदबाबूंची गिरणी जाळली गेली" काका उत्तरले.

त्यांची गाडी आता कोपऱ्यावर वळली. आता चांगलाच काळोख पडला होता. गाडीवाल्याने गाडी थांबवली.

"फक्त एक मिनीट लागेल साहेब" तो म्हणाला, "मी जरा बत्ती लावतो."

कसेंवसें कांबळें लपेटलेला एक किरकोळ माणूस कुठूनतरी गाडीजवळ आला. त्याने तेलाची वात गाडीच्या कंदीलाजवळ धरली.

कंदिलाच्या प्रकाशांत सेमाने त्या माणसाचा कळाहीन चेहरा ओळखला. "चितूबाबू" तो ओरडला.

तो माणूस दचकलाच. त्याने सेमाकडे निरखून पाहिलें.

"कोण ?, सेमा ?" तो घोगऱ्या सुरांत म्हणाला,

सेमाचे काका म्हणाले, "काय झालं चितूबाबू ?"

"चितूबाबू मेला."तो माणूस उदगारला, "अहमदबाबूंची गिरणी जाळली गेली आणि चितूबाबूहि खलास झाला. ४५ लोकांच्या नोकऱ्या गेल्या आता फक्त १० लोक आहेत तिथं, कामावर. आणि बाकीचे ? माझ्यासारखेच उपाशी मरताहेत. माझी वायको इस्पितळांत आहे. क्षयानं आजारी. माझा मुलगा . . . सेमाच्या वयाचा . . . मला सोडून गेला."

सेमाच्या काकांनी त्या माणसाच्या हातांत थोडेसे पैसे कोंबले. गाडी पुढे निघाली. सेमा आणि त्याचे काका, दोघेहि चूपच होते.

आपल्याला गरज लागे त्यावेळीं आपण याच चितूबाबूकडून पैसे घेत होतो. आणि आज ? कसे दिवस बदलतात. ?



सेमाचे काका स्वतःशीच विचार करीत होते.

सेमा व त्याचे काका गाडींतून आजूबाजूच्या दगडविटांच्या ढिगा-यांकडे पाहत होते. त्यांचे मित्र तेथील घरांतून राहत होते. आता ती आठवणहि असह्य होत होती.

थोडयाच दिवसांनी पुनः गडबडीला सुरवात झाली. एक दिवस सेमा व अली शाळेंतून घरीं परतत होते तेव्हा त्यांना एक मोठी मिरवणूक दिसली. ते कोप-यावरून वळले. तिथे त्यांना आणखी एक जमाव दिसला.

तिथून लवकरच सटकलें पाहिजे हें दोघांनाहि कळून चुकलें. त्यांनी चालण्याचा वेग वाढवला. तेवढयांतच कोणाच्या तरी नजरेला अली पडला. त्या दिवशी त्याच्या डोक्यावर लाल तुर्की टोपी होती.

'त्याला पकडा, पकडा त्याला." कोणीतरी अलीकडे बोट दाखवून ओरडलें.

सेमाने अलीचा दंड पकडला. "चला पळा" तो त्याच्या कानाशी कुजबुजला व तो त्या कोप-यावरून वळून धावूं लागला. अलीहि त्याच्या मागोमाग धावत होता.

जमाव जोरांत त्यांच्या पाठीशी लागला.

कोप-यावरून वळल्यावर सेमाने अलीची टोपी काढली व स्वतःच्या डोक्यावर घातली इकडे तिकडे पाहिले. तो उभा होता, तिथे जवळच एक दार अर्धवट लागलेलें होतें.

सेमाने अलीला दरवाज्यांतून आंत ढकललें. इथेच लपून बैस. तोंडातून चकार शब्दहि काढायचा नाही." अलीला सूचना दिलीं व पुन्हा धावायला सुरवात केली.

त्याचवेळी जमाव कोप-यावरून वळला. रस्ता संपेपर्यंत त्याने सेमाचा पाठलाग केला व त्याला पकडलें, जमावांतील एकाने तर त्याला मारायला सुरवात केली.

तेवढयांत जमावांतील दुसरा एकजण ओरडला, "त्याला मारू नका. तो आदिवासी मुलगा आहे. आमच्या घराजवळच राहतो. आजच त्याने टोपी घातली आहे"









जमावांतील आणखी एकाजणाने सेमाच्या थोबाडींत मारली. ‘‘ही टोपी घातल्यावर अस्सं बक्षिस मिळतं’’ काही जण ओरडले. त्यांनी ती फुटपाथवर फेकली. ‘‘पुन्हा घालून तर बघ, मग दिसेलच काय होतं तें’’, असें दरडावून ते सगळे चालते झाले

सेमा जमिनीवर कोसळला आणि निपचीत पडून राहिला.

ते नजरेआड होतांच सेमा लटपट उठून उभा राहिला. अली लपला होता त्याजागीं कसाबसा पोचला.

“गडबड थांबेपर्यंत आपण इथेच थांबू या,” तो म्हणाला. दोघेहि तशी वाट पाहत पडून राहिले.

थोडयाच वेळाने तिथे दुसरा जमाव येऊन थडकला.

“पकडा त्या हिंदूला, त्या हिंदूला पकडा,” त्यांतले लोक बेभान होऊन ओरडत होते.

“ते जर इथे आलेच, तर मी त्या हलकटांना चांगला धडा शिकवीन,” अली निर्भयपणे म्हणाला.

“तूं इथेच गुपचुप पडून राहा.” त्याने सेमाला सांगितलें. पावलांचा आवाज आता जवळ येऊं लागला. जवळ . . . आणखी जवळ. पण जमाव कोप-यापरून वळला व दिसेनासा झाला.

सगळीकडे पुन: भयाण शांतता पसरली.

थोडयाच वेळाने तिथे पोलीस आले. पण ते येईपर्यंतचा काळ त्या दोघाना दहा वर्षांसारखां वाटला.

दोघेहि उठून उभे राहिले व त्यांनी दरवाज्यांतून डोकावून पाहिलें. पोलीसदादांनी त्यांना पाहिले व ते त्यांच्याजवळ आलें.

"तुम्ही कुठे राहतां बाळांनो ?" त्यांनी विचालें. फारच प्रेमळ वाटत होते ते.

"चला, मी तुम्हाला तुमच्या घरीं पोचवतो." ते पुन्हा म्हणाले आणि पोलीसदादा खरोखरच दयाळू निघाले. त्यांनी दोघांनाहि सेमाच्या घरीं पोचवलें.

अलीचे आईवडिलहि सेमाच्या घरीं आलें होते, अलीची चौकशी करायला. तें काळजींत पडले होते.



अलीला पाहिल्यावर त्याची आई रडूं लागली. "मला वाटलं माझ्या राजाला कोणीतरी मारून टाकलं" ती म्हणाली.

"मला मारायला सगले लोक कां टपले आहेत, हो काका ?" अली सेमाच्या काकांना विचारू लागला.

कारण ते लोक अगदी वाईट आहेत "सेमाचे काका म्हणाले," धर्म म्हणजे काय, दयाळूपणा कशाला म्हणतात, कांही कांही त्यांना ठाऊक नाहीं. कशाचा तरी द्वेष करायचा एवढं त्यांना ठाऊक आहे.

"पण तरीहि एक गोष्ट विसरायची नाही अली," सेमाचे काका पुढे म्हणाले, "अजूनहि खूप चांगले लोक आहेत इथे. आपण सगळयांनी सुखी व्हावं म्हणून काम करण्याची त्यांना तळमळ आहे कोणाचाहि जीव घेण्यावर त्यांचा विश्वास नाहीं."

अली व सेमा यांनी माना हलवल्या.

दोघेहि रडत होते पण काकांच्या म्हणण्याचा अर्थ त्यांना समजला होता. त्यांचे सांगणे पटलें होतें,

